## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ०७ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात 'ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य' या विषयावर कृष्णा संदानशिव यांचे व्याख्यान शनिवार, दि. ५ एप्रिल रोजी झाले.

यावेळी अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा.म.सु. पगारे हे होते. संदानशिव यांनी भालचंद्र नेमाडे देशीवादाचे जनक असा उल्लेख करत त्यांच्या साहित्यातील देशीवादाची मांडणी केली. प्रा. म.सु. पगारे यांनी साहित्यिक हा साहित्याच्या माध्यमातून समाजाचे दर्शन घडवितो म्हणून साहित्यकृती समाजाच्या वास्तविक बाजू मांडणाऱ्या असाव्यात असे सांगितले. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरे झाली. यावेळी डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. दीपक खरात, भारती सोनवणे, डॉ. प्रिती सोनी, हेमराज पाटील व प्रशाळेचे विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रतिभा गलवाडे यांनी मानले.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ — दिनांक: ७ एप्रिल, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता